## बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. एमजीसी / ए / 5207 दिनांक 17.05.2024

आदेशान्वये, सोबत जोडण्यात आलेल्या अनुसुची नुसार, वृक्ष कापणे व वृक्ष पुनर्रोपित करण्याबाबतचे प्रस्ताव महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण यांच्या मान्यतेकरिता उद्यान अधिक्षक/उप आयुक्त (उद्याने) या विभागाकडून प्राप्त झाली आहेत. सदर प्रस्तावामधील बहुतांश वृक्षे ही कापण्यापासुन वाचविता येऊ शकतील का याबाबत खातरजमा करुन/प्रस्तावांचा फेरविचार करुन नस्ती पुनश्च फेरसादर कराव्यात.

सह आयुक्त (आयुक्त कार्यालय)

उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी

N-3

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## वृक्ष प्राधिकरण

**क्रमांक :** उउअ / वृप्रा / 43 / परि.-6
**दिनांक :** 16 /10 / 2024

**विषय :** 'एस' विभागातील भांडुप व्हिलेज रोड, भांडूप (प.), मुंबई येथे एस.आर.एल. डायगोस्टीक जवळील नाल्यावरील पुलाचे निष्कासन व पुनर्बांधणीच्या कामात बाधित होत असलेल्या वृक्षांची कापणी / पुनर्रोपण करणेच्या परवानगीबाबत .

**संदर्भ :** एमजीसी / ए / 5207, दि. 17.05.2024

'एस' विभागातील भांडुप व्हिलेज रोड, भांडूप (प.), मुंबई येथे एस.आर.एल. डायगोस्टीक जवळील नाल्यावरील पुलाचे निष्कासन व पुनर्बांधणीच्या कामात बाधित होत असलेले **02 (दोन)** झाडे कापण्यास /पुनर्रोपित करण्यास परवानगी मिळणेबाबत, कार्यकारी अभियंता (पुल) परिमंडळ – 6 [Executive Engineer (Bridge) Z-VI] ह्यांजकडून, दि. 24.07.2024 रोजी 'एस' विभाग कार्यालयास सादर करण्यात आलेला विनंतीचा प्रस्ताव, 'एस' विभाग उद्यान खात्यामार्फत दि. 04.09.2024 रोजी उद्यान खाते, परिमंडळ - 6 कार्यालयास प्राप्त झाला.

मा. सह आयुक्त (महानगरपालिका आयुक्त कार्यालय) यांच्याकडून प्रस्तावामधील कापणे / पुनर्रोपित करिता प्रस्तावित बहुतांश वृक्ष ही वाचविता येऊ शकतील का याबाबत खातरजमा करून/ प्रस्तावांचा फेरविचार करूनच सादर करण्याबाबत पत्र क्र. एमजीसी / ए / ५२०७ दि. १७.०५.२०२४ अन्वये आदेश दिलेले आहेत. सदर प्रस्तावातील 02 वृक्ष प्रस्तावित पुलाकरीता उत्खननात बाधित होत असल्याने, वाचविणे शक्य नाही.

यास्तव, सदर प्रस्तावातील बाधित वृक्ष हे प्रस्तावित ब्रिजकरीता उत्खननात बाधित होत असल्याची खात्री करण्यात आली असून, सदर वृक्ष वाचविणे शक्य नसल्याची खातरजमा करण्यात आलेली आहे.

तरी सदर प्रस्ताव, मंजूरीकरीता व स्वाक्षरीकरीता सविनय सादर.

एसजी/ 2952 /टीए
17/10/24

(सही) 14.10.2024
**उप उद्यान अधिक्षक (परि.-6)**

**मा. उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**
महोदय,

(सही)
उदयान अधीक्षक

**मा. उप आयुक्त (उद्याने)**
**महोदय,**

मंजूरीकरीता सविनय सादर.

(सही) 25/11/24
उप आयुक्त (उद्याने) प्र.

**मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**
महोदय,

बृहन्मुंबई महानगरपालिका
उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय
व वृक्ष प्राधिकरण
16 OCT 2024
क्रमांक SGI/ TA/2952

उप आयुक्त (उद्याने) यांचे कार्यालय
क्रमांक: उप आयुक्त/उद्याने/ 2207
आवक दिनांक : 18.10.2024 (file)
जावक दिनांक : 25-11-2024

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
26 NOV 2024
क्रमांक MDG/ 928/
26/11/24

बृहन्मुंबई महानगरपालिका
उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय
व वृक्ष प्राधिकरण
26 DEC 2024
क्रमांक SGI/ MC/1573
27/12/24

उ.अ.उ. (Z-I/II, III, IV, V, VI, VII, TA)
प्रशा. अ. VJBU
योग्य त्या कार्यवाही करिता

उद्यान अधिक्षक

उप-...अधिक्षक
...6
जा... TA/P/ 43
दिना... 27/12/2024

H.A

सहा उद्यान अधिक्षक
एन / एस / टी विभाग
मु.बि./ लिपिक व व्य.
योग्य त्या कार्यवाहीसाठी/चर्चा करावी
अहवाल ... दिवसात सादर करावा

उप उद्यान अधिक्षक (परि- )

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक : एसजी/.2952./टीए
दिनांक : ....17/10/24.....

**विषय :** 'एस' विभागातील भांडुप व्हिलेज रोड, भांडूप (प.), मुंबई येथे एस.आर.एल. डायगोस्टीक जवळील नाल्यावरील पुलाचे निष्कासन व पुनर्बांधणीच्या कामात बाधित होत असलेल्या वृक्षांची कापणी / पुनर्रोपण करणेच्या परवानगीबाबत .

1. “महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975” च्या कलम 8 (6) मधील तरतूदीनुसार काढण्यात येणा-या झाडांची संख्या 25 (पंचवीस) अथवा त्यापेक्षा कमी असल्यास वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्य महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. तदनुषंगाने महानगरपालिका आयुक्त व अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण यांच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर परवानगी देण्यात आलेल्या प्रस्तावाची नोंद / अभिलेख उद्यान अधिक्षक / वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत ठेवण्यात येईल.
2. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक 46/2015 मधील दि. 21.02.2018 रोजीच्या आदेशान्वये मा. महानगरपालिका आयुक्त यांना महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 च्या कलम 8 मधील पोट कलम 6 अन्वये प्रधान करण्यात आलेले अधिकार वापरण्यास मज्जाव करण्यात आला होता.
3. सदरहू बाबतीत मा. उच्च न्यायालयाने सुधारीत आदेश दि. 23.04.2018 रोजी पारित केले असुन, त्यात काही अर्टींसह सुधारणा झाल्या असुन, मा. महानगरपालिका आयुक्त, यांना आपले अधिकार वापरण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव पुढील प्रमाणे आहे.

'एस' विभागातील भांडुप व्हिलेज रोड, भांडूप (प.), मुंबई येथे एस.आर.एल. डायगोस्टीक जवळील नाल्यावरील पुलाचे निष्कासन व पुनर्बांधणीच्या कामात बाधित होत असलेले **02 (दोन)** झाडे कापण्यास /पुनर्रोपित करण्यास परवानगी मिळणेबाबत, कार्यकारी अभियंता (पुल) परिमंडळ – 6 [Executive Engineer (Bridge) Z-VI] ह्यांजकडून, दि. 24.07.2024 रोजी 'एस' विभाग कार्यालयास सादर करण्यात आलेला विनंतीचा प्रस्ताव, 'एस' विभाग उद्यान खात्यामार्फत दि. 04.09.2024 रोजी उद्यान खाते, परिमंडळ - 6 कार्यालयास प्राप्त झाला.

1. सदरहू जागेची पाहणी दिनांक 05.08.2024 रोजी उद्यान खात्यातील खालील प्रमाणे अधिकारी

1) उ.वि.स./ क.वृ.अ. 'एस' विभाग :- श्रीम. अक्षया म्हात्रे
2) सहा.उद्यान अधिक्षक 'एस' विभाग :- श्री. सुजित मोहिते
3) उप उद्यान अधिक्षक (परि.-6) :- श्री. साहेबराव गावित

यांनी केली असता असे आढळून आले की, सद्यस्थितीत सदरहू जागेवर **एकूण 02 (दोन)** झाडे अस्तित्वात असून, सदर झाडे भांडुप व्हिलेज रोड, भांडूप (प.), मुंबई येथे एस.आर.एल. डायगोस्टीक जवळील नाल्यावरील पुलाचे निष्कासन व पुनर्बांधणीच्या कामात बाधित होत आहे. यास्तव, सदरहू बाधित **02 (दोन)** झाडे (झाडाचा क्र. 1 आणि 2) [पृ.क्र. सी- 23 ते 25 आणि 27 ते 29] **कापणे** व उर्वरित **निरंक** झाडे **आहे तसेच ठेवणेकरीता** प्रस्तावित करण्यात येत आहे. पाहणीचा सविस्तर अहवाल यासोबत सादर करण्यात आलेला आहे. (पृष्ठ क्र. सी-19) व त्या

अनुषंगाने पक्षकाराने दि. 02.09.2024 रोजी कागदपत्रांची पुर्तता केली. त्याचप्रमाणे, सदरहू प्रस्तावामध्ये कापणे / पुनर्रोपित करणेकरीता प्रस्तावित वृक्षांमध्ये हेरिटेज वृक्षांचा समावेश नाही, याची खात्री करण्यात आलेली आहे.

| अ. क्र | वृक्ष क्र. | जात | वनस्पती शास्त्रीय नाव | अंदाजे उंची | अंदाजे घेर | वृक्षाचे अंदाजे वय(वर्षे) | कापणे / पुनर्रोपित करणे/ आहे तसेच ठेवणे | कारण / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | 1 | पेल्टोफोरम | पेल्टोफोरम फेरुग्युयानम | 25'-30' | 3'-4' | 30 | कापणे | सदर झाडे प्रस्तावित पुलाच्या संरेखनात (Alignment of Pile & pile cap ) बाधित होत आहेत. |
| 2 | 2 | करंज | पोंगामिया पिन्नाटा | 25'-30' | 3'-4' | 30 | कापणे | |

4. या प्रकरणी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975" च्या कलम 8 (6) मधील तरतूदीनुसार सदरहू प्रस्तावाची स्थानिक वृत्तपत्रात दि. 20.09.2024 रोजी जाहिरात देण्यात आलेली आहे व काढणे आवश्यक असलेल्या सर्व झाडांच्या ठळक भागावर नोटीस / सूचना चिकटवण्यात आले असून, सदर नोटीस / सूचनेसहीत झाडांचे छायाचित्र माहितीकरीता ह्या सोबत जोडण्यात आलेले आहेत. (पृष्ठ क्र.सी- 23 ते 29) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने त्याबाबतची सुनावणी उद्यान अधिक्षक यांच्या दालनात दि. 27/09/2024 रोजी दुपारी 04 : 30 ते 5 :00 या कालावधीत ठेवण्यात आली होती. परंतू, सदरहू प्रस्तावाबाबत दि. 27.09.2024 रोजीपर्यंत प्रत्यक्ष व ई-मेलद्वारे कोणतेही आक्षेप / सूचना प्राप्त झालेले नाहीत. (पृष्ठ क्र.सी- 33).

5. नवीन लावण्यात येणारी झाडे व पुनर्रोपित करण्यात येणारी झाडे वृक्ष प्राधिकरणाच्या मानांकानुसार महानगरपालिकेच्या भुभागावरील मोकळ्या जागेत लावण्यात येतील व नवीन लावण्यात येणा-या झाडांची उंची 6-8 फुटापेक्षा व घेर 06 इंचापेक्षा कमी नसेल.

6. पक्षकाराने कामाच्या अंमलबजावणीबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील कालावधीबाबत तसेच नविन लावण्यात येणारी झाडे, यांच्या ठिकाणाबाबत फेरफार करावयाचा असल्यास, मा. उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी हे संपूर्ण प्रस्तावाची शहानिशा करुन आवश्यक असल्यास फेरफार करण्यास संमती देतील.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 (दिनांक 16 जानेवारी 2017 पर्यंत सुधारीत) च्या कलम 8 (6) मधील तरतुदींनुसर काढण्यात येणा-या झाडांची संख्या **25 (पंचवीस)** अथवा त्यापेक्षा कमी असल्यास वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्य महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दि. 23.04.2018 रोजीच्या आदेशात खालीलप्रमाणे अटी व शर्ती घालण्यात आले आहे.

1. महानगरपालिका आयुक्त हे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलब्ध असलेले तज्ञ यांचा सल्ला घेतील व आदेश परित करताना ज्या तज्ञांकडुन सल्ला घेण्यात आला आहे त्यांचे नाव नमूद करतील.

2. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा. महानगरपालिका आयुक्त यांनी सदर बाबतीत परवानगी दिल्यास सदरबाबतची सुचना स्थानिक वृत्तपत्रात प्रदर्शीत करण्यात यावी व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी. सदरहू सुचना वृत्तपत्र व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड झाल्याच्या 21 दिवसांपर्यंत सदरहू परवानगीची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.

3. महानगरपालिका आयुक्त हे एका विविक्षित भूभागावर एकदाच परवानगी देऊ शकतील.

मा. उच्च न्यायालयाने वरील प्रमाणे दिलेल्या आदेशांचे अनुपालन प्रस्तावीत करण्यात आले आहे व ते खालील प्रमाणे आहे.

1. महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील खालील तज्ञ अधिका-यांनी स्थळ पाहणी केलेली आहे.

   1) उ.वि.स./ क.वृ.अ. 'एस' विभाग :- श्रीम. अक्षया म्हात्रे
   2) सहा.उद्यान अधिक्षक 'एस' विभाग :- श्री. सुजित मोहिते
   3) उप उद्यान अधिक्षक (परि.-6) :- श्री. साहेबराव गावित

2. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा. महानगरपालिका आयुक्त यांनी सदरबाबतीत परवानगी दिल्यास , सदरबाबतची सुचना स्थानिक वृत्तपत्रात प्रदर्शीत करण्यात येईल व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. सदरहू सुचना वृत्तपत्र व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेरस्थळावर अपलोड झाल्याच्या 21 दिवसांपर्यंत सदरहू परवानगीची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.

3. सदर भूभागावर यापुर्वी मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरणाकडुन कोणतेही परवानगी देण्यात आलेली नाही. नियमांनुसार / आदेशानुसार आवश्यक ती अर्ज प्रक्रिया शुल्क व अनामत रक्कम स्विकारल्यानंतर तसेच निकषानुसार आवश्यक ती नवीन झाडे लावण्याच्या अटीसह परवानगी देण्यात येईल.

यास्तव, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 च्या कलम 8(3)(क) मधील तरतुदीनुसार, 'एस' विभागातील भांडुप व्हिलेज रोड, भांडूप (प.), मुंबई येथे एस.आर.एल. डायगोस्टीक जवळील नाल्यावरील पुलाचे निष्कासन व पुनर्बांधणीच्या कामात बाधित होत असलेल्या वृक्षांबाबत खालील प्रमाणे प्रस्ताविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कारण | कापणे | पुनर्रोपित करणे | आहे तसेच ठेवणे | एकुण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | प्रस्तावित पुलाकरीता उत्खननात बाधित. | 02 झाडे (क्र. 1 आणि 2) | --- | --- | 02 | कापणे करणेकरिता प्रस्तावित |
| | **एकुण** | **02** | **00** | **00** | **02** | |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार अ.क्र. 1 मधील 02 वृक्ष कापणेकरीता प्रस्तावित येत आहे.

सदर प्रस्तावाची पडताळणी करण्यात आलेली असून, यथायोग्य असल्याने मंजूरी करिता शिफारस करण्यात येत आहे.

**उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**

**मा. उप आयुक्त (उद्याने)**

महोदय,

उप आयुक्त (उद्याने) प्र.

**मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**

महोदय,

24/12

महानगरपालिका आयुक्त

**<u>कापणे / पुनर्रोपित करणेकरीता प्रस्तावित झाडांची सूची</u>**

| अ.क्र. | वृक्षाची जात | एकूण कापणे संख्या | एकूण पुनर्रोपित संख्या |
|---|---|---|---|
| 1 | पेल्टोफोरम | 01 | 00 |
| 2 | करंज | 01 | 00 |
| **एकुण** | | **02** | **00** |